ePaper

**“शिवरायांचा अपमान करणाऱ्या भाजपवाल्यांना वेगळा कायदा...” संजय राऊतांची चपराक**

| वर्ष - 8 | अंक - 231 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- आधी तुमच्या क्रिकेट बोर्डाला विचारा!
- प्रियाची भावुक पोस्ट
- ए खून के प्यासे बात सुनो!
- भाजपा खासदाराला अटक का नाही?


www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 8 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दीपक मानकर आणि जगदीश मुळीक यांच्यात रस्सीखेच

# पुण्याला मिळणार आणखी एक आमदार!

## विधान परिषदेवर कोणाची वर्णी लागणार ? 27 मार्चला मतदान

| मुंबई-पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेच्या रिक्त पाच जागांसाठीच्या निवडणुकीची घोषणा झाली. हे घडले मुंबईमध्ये.. पण, पुण्यातील वातावरणामध्ये बदल होत ‘महायुती’ तील मित्रपक्षांमध्येच अंतर्गत संघर्ष आणि सुप्त इच्छा व्यक्त करण्यास सुरुवात आणि रस्सीखेच सुरू झाली आहे.**



भारतीय जनता पार्टीकडून जगदीश मुळीक आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून दीपक मानकर या दोघांमध्ये चुरस असून जोरदार ‘फील्डिंग’ लावणे सुरू झाले आहे.

**प्रामाणिक कष्टाचे फळ मिळणार..**

पुण्यातून प्रमुख दावेदार असलेल्या दीपक मानकर आणि जगदीश मुळीक या दोघांनीही लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये पक्ष आदेश मान्य करत अन्य उमेदवारांचे प्रचार केले होते, त्याचे फळ मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या दोन निवडणुकांमध्ये या दोघांनीही आपल्या पक्षाशी बांधिलकी दाखवत पुणे लोकसभेची हक्काची जागा विजयी करण्यात अतिशय बहुमूल्य योगदान दिले. तथापि, हक्काचा बालेकिल्ला असलेला वडगाव शेरी मतदारसंघ मात्र भाजपा आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांना आपल्या ताब्यात न राखता आल्याने शहराध्यक्ष म्हणून दीपक मानकर आणि स्थानिक भाजपाचे नेतृत्व व माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक या दोघांच्या कारकीर्दीला या पराभवाने झटका दिला आहे.

**हा तर भाजपचा बालेकिल्ला..**

वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघांमध्ये पुणे महानगरपालिकेवर सर्वाधिक म्हणजे २२ नगरसेवक भारतीय जनता पक्षाचे निवडून देण्यात जगदीश मुळीक यांचे मोलाचे योगदान होते. ते गेल्या दोन्ही निवडणुकांना इच्छुक होते. परंतु, पक्ष कार्याला सर्वोच्च मानत आजही जगदीश मुळीक यांच्याकडून भारतीय जनता पक्षाचे काम त्याच तडफेने आणि हिरारीने केले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दृष्टीने जगदीश मुळीक यांना संधी देणे क्रमप्राप्त आहे, तर राष्ट्रवादीच्या फुटीनंतर संपूर्ण पुणे शहरात,सर्वात कमी कालावधीमध्ये,सर्वात मोठी कार्यकारणी तयार करण्याची किमया दीपक मानकर यांनी केल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही दीपक मानकर यांना संधी द्यावी, असे वाटत आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

**विधान परिषदेत पाच रिक्त जागा**

विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. विधानसभा परिषदेचे काही सदस्य हे विधानसभा निवडणुकीत निवडून आल्याने या जागा रिक्त झाल्या आहेत. येत्या 27 मार्चला मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता पडद्यामागे राजकीय घडामोडींना जोरात वेग आल्याची माहिती आहे.

### कोणत्या रिक्त पाच जागा?

शिवसेना शिंदे गटाचे आमदार आमशा पाडवी, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश विटेकर, भाजप आमदार प्रवीण दटके, भाजपचेच गोपीचंद पडळकर आणि रमेश कराड या सदस्यांच्या रिक्त जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. आता, या रिक्त जागांसाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीकडून कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. विधान परिषदेवर भाजपचे तीन , राष्ट्रवादी आणि शिवसेना प्रत्येकी एक जागा रिक्त झाली आहे.

## थेरगाव बटरफ्लाय पुलाच्या कामात गैरव्यवहार

# आमदार जगताप यांनी केली चौकशीची मागणी

| पुणे |
महाईन्यूज | प्रतिनिधी|



थेरगाव दरम्यानच्या बटरफ्लाय ब्रिजच्या कामातील कथित गैरव्यवहारावर आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. सदर पुलाच्या कामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित ठेकेदार, सल्लागार आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. थेरगाव येथील प्रसून धाम हाउसिंग सोसायटीजवळून चिंचवड-थेरगाव जोडणाऱ्या बटरफ्लाय ब्रिजच्या कामासाठी २०१७ साली धनेश्वर कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराला २८ कोटी ७१ लाख रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली.

विशेष म्हणजे ही निविदा मूळ अंदाजपत्रकाच्या १४% अधिक दराने मंजूर करण्यात आली होती.

### चौकशी तज्ज्ञांमार्फत होणार?

बटरफ्लाय पुलासाठी तब्बल ३९.७४ कोटी रुपये खर्च करूनही सात वर्षांत काम पूर्ण का झाले नाही. त्यामुळे ठेकेदार आणि कन्सल्टंटला काळ्या यादीत टाकून दंडात्मक कारवाई केली जाणार का? या प्रकरणाची चौकशी टाटा कन्सल्टन्सी किंवा सीओईपीच्या तज्ज्ञांमार्फत केली जाणार का असा सवाल आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केला आहे.

## राज्यातील सर्व ग्राम पंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा

# राज्य महिला आयोगाची संकल्पना!

## बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंदीसाठी होणार ठराव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत उद्या ८ मार्च २०२५ रोजी राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्राम सभा आय़ोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आय़ोगाच्या संपल्पनेनुसार बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे तसेच महिला सुरक्षिततेसाठीचे ठराव या ग्रामसभांमध्ये करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य महिला आय़ोगाने केलेल्या मागणीनुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ८ मार्च रोजी, जागतिक महिला दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आय़ोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**




याबाबत अधिक माहिती देताना महिला आय़ोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या, "पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात आजही मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर असतानाही, विधवा महिलांना रुढी व अंधश्रद्धेमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागते आहे. या सोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक स्तरावर जनजागृती व्हावी यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून गावात बालविवाह होउ न देणे, पतीच्या निधनानंतर महिलांना जाचक असणार्या प्रथा बंद करणे, गावात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे असे ठराव करण्यात यावे अशी आयोगाची संकल्पना आहे. संपूर्ण गावात असे ठराव शासकीय पातळीवर झाल्यास जनसामान्यांच्या मनात महिलांना सन्मानाने वागवणे ही कर्तव्य भावना रुजवता येईल. महिलांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्याकडे पाहाण्याचा दृष्टीकोनही अशा प्रयत्नांतून बदलेल म्हणून आय़ोगाने ही संकल्पना मांडली आहे,".

### महिला सक्षमीकरणासाठी बळ मिळेल

विशेष ग्रामसभा आयोजित करण्यास निर्देश दिल्याबद्दल त्यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे आभार मानले. राज्यात पहिल्यांदाच महिलांच्या विषयांकरिता विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा मैलाचा दगड असल्याचे चाकणकर यांनी सांगितले.

### राज्य शासनाचा पुढाकार

राज्य महिला आयोगाने दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी याबाबत कार्यवाही करण्याकरिता ग्रामविकास विभागाला पत्राद्वारे कळविले होते. तसेच केंद्र शासनाच्या पंचायती राज विभागाच्या अपर सचिवांनी देशातील सर्व राज्यातील ग्रामविकास सचिवांना पत्रान्वये जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभा आयोजित करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार शासनाकडून ही कार्यवाही करण्यात आली आहे.

## लोकमान्यांच्या वास्तूत हेरिटेज वॉक

## नि:शुल्क पद्धतीने नव्या उपक्रमाची होणार सुरवात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' आणि 'हेरिटेज इंडिया कम्युनिकेशन्स'' यांच्या संयुक्त विद्यमाने पुणेकरांसाठी 'हेरिटेज वॉक' या उपक्रमाची सुरुवात करण्यात येत आहे. हा उपक्रम नि:शुल्क असून श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्राच्या सहकार्याने चालवण्यात येणार आहे.**



लोकमान्य टिळक, हे नाव समोर येताच ब्रिटिशांना 'सळो की पळो करून सोडणारी त्यांची लेखणी, सरकारचं डोकं ठिकाणावर आहे काय, हा संतप्त सवाल आणि त्यांनी केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांच्या पायाभरणीचा इतिहास लगेच आठवतो. या सगळ्याची उजळणी आणि लोकमान्यांचं जिथं दीर्घकाळ वास्तव्य होतं, अशा नारायण पेठेतल्या केसरीवाड्याला भेट देण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या रविवारी (दि. ९ मार्च २०२५) केसरीवाडा इथे सकाळी १० वाजता हेरिटेज वॉक होणार आहे. लोकमान्य टिळकांचे पणतू, ज्येष्ठ संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक हे या कार्यक्रमामध्ये उपस्थितांशी संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमात टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक या सुद्धा उपस्थित असतील. केसरीवाडा हा लोकमान्यांनी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याकडून विकत घेतलेला असल्यामुळे वाड्याला गायकवाड वाडा अशी प्रसिद्धी मिळाली. हा वाडा पुढे टिळकांच्या अनेक उपक्रमांचा साक्षीदार ठरला. 'केसरी' आणि 'मराठा' ही वृत्तपत्रं इथूनच प्रकाशित होत असत. टिळकांच्या कार्याच्या या सगळ्या स्मृती या वाड्यात असलेल्या लोकमान्य टिळक संग्रहालयानने जपून ठेवल्या आहेत. हे संग्रहालय आठवडाभर सर्वांसाठी खुले असते. या हेरीटेज वॉकमध्ये संग्रहालयही पाहता येणार आहे. या सगळ्याची उजळणी आणि लोकमान्यांचं जिथं दीर्घकाळ वास्तव्य होतं, अशा नारायण पेठेतल्या केसरीवाड्याला भेट देण्याची संधी वारसाप्रेमींना मिळणार आहे. येत्या रविवारी (दि. ९ मार्च २०२५) केसरीवाडा इथे सकाळी १० वाजता हेरिटेज वॉक होणार आहे. लोकमान्य टिळकांचे पणतू, ज्येष्ठ संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक हे या कार्यक्रमामध्ये उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. यावेळेस टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्रातील अध्यापकांनी लिहिलेल्या An Overview of Indian Knowledge Systems या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

### संग्रहालय आठवडाभर सर्वांसाठी खुले

हेरिटेज वॉकमध्ये सहभागी होणाऱ्यांनी सकाळी ९.४५ वाजता केसरीवाड्यातल्या लोकमान्य सभागृहात जमावे ही विनंती.

* केव्हा :रविवार, ९ मार्च २०२५
* कुठे : केसरीवाडा, नारायण पेठ, पुणे - ३०
* वेळ : सकाळी १०

# गुन्हेगारांसमोर चक्क पोलिसांचा राडा'

# भाई का बड्डे...!!

## पोलिस ठाण्यासमोरच पोलिस शिपायाचा वाढदिवस साजरा

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**सांगवी पोलिस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांनी तर कहरच केला आहे. एका पोलिस शिपायाचा वाढदिवस चक्क रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या उपस्थितीत रस्त्याच्या मधोमध टेबल टाकून, फटाक्यांची आतषबाजी करीत आणि या सेलीब्रेशनचे ड्रोन कॅमेऱ्याने चित्रीकरण करून जल्लोषात साजरा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रीकरणाच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे अखेर पोलिस आयुक्तांनी कडक कारवाई करत वाढदिवस साजरा करणाऱ्या चार पोलिस कर्मचाऱ्यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. तर, सांगवी ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची नियंत्रण कक्षात बदली केली आहे.**





निलंबित केलेल्यांपैकी एक पोलीस हवालदार हा भाजपच्या माजी नगरसेवकाचा भाऊ आहे. सांगवी ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. पोलीस हवालदार विवेक गायकवाड यांच्यासह बर्थ डे बॉय पोलीस शिपाई प्रवीण पाटील, सुहास डंगारे, विजय मोरे अशी तडकाफडकी निलंबित करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पोलीस हवालदार विवेक गायकवाड हे भाजपचे माजी नगरसेवक विनायक गायकवाड यांचे भाऊ आहेत. निलंबित केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी पोलीस पाल्य (लाईन बॉईज) असल्याचे समजते. सांगवी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पोलिस शिपाई प्रवीण पाटील यांचा गुरूवारी (दि. ६) वाढदिवस होता. त्यानिमित्त बुधवारी मध्यरात्री बारा वाजता पाटील त्यांचे सहकारी बर्थ डे सेलीब्रेशन करण्यासाठी जमा झाले. त्यांनी थेट पोलिस ठाण्याच्या बाहेरच मुख्य रस्त्यावर टेबल टाकला. 'दादा' असे लिहिलेला एक भलामोठा केक टेबलवर ठेवण्यात आला. त्यावेळी इतरांच्या हातात फटाका फायर गन, स्काय शॉट होते. उपस्थितांमध्ये चक्क रेकॉर्डवरील गुन्हेगारही उपस्थित होते. फटाक्यांची आतषबाजी, जोरजोरात घोषणा आणि वाहनांच्या हॉर्नचा आवाज यामुळे संपूर्ण परिसरात गोंधळ निर्माण झाला. अशा थाटामाटाच्या वातावरणात मोठ्या उत्साहात पोलीस शिपाई पाटील यांनी वाढदिवसाचा केक कापला. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर यावर समाजातील विविध क्षेत्रांतून टीका होऊ लागली. याची दखल घेत पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगवी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांसह चार पोलिस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. यासंदर्भात सहायक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, या प्रकरणात चार पोलीस कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. तर, वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

### ड्रोन कॅमेऱ्याने शूटिंगचा व्हिडिओ व्हायरल

वाढदिवसाचे चित्रीकरण करण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यात आला. या जल्लोषाचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. एका पोलिस ठाण्याबाहेरच अशा पद्धतीने शिस्त मोडली जात असल्याने पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाली. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तातडीने चौकशीचे आदेश दिले.

"पोलिस दलात शिस्त हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जर पोलिसच कायदा मोडत असतील आणि अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालत असतील, तर जनतेला काय संदेश जाईल. अशा प्रकारची बेशिस्त वागणूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही."

**–विनयकुमार चौबे,** (पोलीस आयुक्त)

---

# सक्षम पिढीसाठी निसर्गाशी नाते दृढ हवे

## अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे : रानजाई महोत्सव; महापालिकेच्या वतीने 7 ते 9 मार्च दरम्यान आयोजन

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धन आणि वृक्षारोपणाची जाणीव निर्माण व्हावी. जैवविविधतेचे महत्व कळावे तसेच पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. यातूनच भविष्यासाठी सक्षम पिढी घडेल आणि निसर्गाशी नाते दृढ करणेही तितकेच आवश्यक आहे, असे मत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार ोराटे यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण यांच्या वतीने रानजाई महोत्सव' व २८ वे भव्य 'फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन व स्पर्धेचे आयोजन नियोजित महापौर निवास निगडी प्राधिकरण येथील मोकळ्या मैदानात ७ ते ९ मार्च २०२५ या कालावधीत करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता मनोज सेठीया, बाबासाहेब गलबले, उपआयुक्त अण्णा बोदडे, माजी नगरसेवक अमित गावडे, माजी नगरसदस्या शर्मिला बाबर, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, कार्यकारी अभियंता नितीन निंबाळकर, विजय जाधव, नितीन देशमुख, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज, राजेश वसावे, माजी उद्यान संचालक दादाभाऊ पवार, उपलेखापाल अनिल कुऱ्हाडे, मुख्य लिपीक देवेंद्र मोरे तसेच महापालिका कर्मचारी, शालेय विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे म्हणाले, निसर्गसौंदर्याने नटलेली फुलांची आकर्षक सजावट, कलात्मक आकृती मांडणी आणि हरित वातावरणाचा समृद्ध अनुभव रानजाई महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना मिळत असतो.


उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे म्हणाले, पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षांचे महत्त्व अमूल्य आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा मोठा भाग हिरवाईने नटलेला असून, शहराचे पर्यावरण संतुलीत ठेवण्याचे महत्वपूर्ण कार्य वृक्ष प्राधिकरण समिती करत असते.

यावेळी महापालिकेच्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी अभंग गायनाचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे यांनी तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी तर उपस्थितांचे आभार उद्यान अधिक्षक योगेश वाळुंज यांनी मानले.

### 9 मार्च रोजी कार्यक्रमस्थळी बक्षिस वितरण समारंभ

रानजाई महोत्सवात 'फळ-फुले भाजीपाला बागा प्रदर्शन व स्पर्धेचे आयोजन केले जाते. त्यामध्ये शोभिवंत पाना फुलांच्या कुंड्यांच्या स्पर्धा, कारखानदार बाग स्पर्धा, खाजगी बंगल्याभोवतालच्या बाग स्पर्धा तसेच वृक्षारोपण स्पर्धांचे आयोजन केले जाते. या गटांमधील विजेत्यांना महापालिकेच्या उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाच्या वतीने फिरते चषक तसेच रोख रक्कम स्वरूपात बक्षिसे देण्यात येणार आहेत. ९ मार्च रोजी कार्यक्रमस्थळी बक्षिस वितरण समारंभ संपन्न होणार आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचातील थोडीतरी चिकाटी भगवंतासाठी धरावी.

लग्न करणे याला आपण सामान्यतः प्रपंच समजतो. लग्न ही फार पवित्र संस्था आहे. तिच्यामध्ये दोन जीवांचा उद्धार आहे. ज्याप्रमाणे गुरू आणि शिष्य यांचा संबंध असतो, म्हणजे दोघांचे मत एकच असते, त्याप्रमाणे पती आणि पत्नी यांचा संबंध असावा. पत्नी आपले सर्वस्व पतीला देते, यामध्येच खरे पवित्रपण आहे. लग्नाचा पवित्रपणा ज्या वेळी नाहीसा होईल त्यावेळी आपल्या धर्माचा पायाच उखडला असे समजावे. आपली अशी समजूत असते की, लग्न केले तेव्हा सुख हे लागणारच. जे जे परमेश्वराने निर्माण केले ते माझ्या सुखासाठीच केले असे आपण म्हणतो. वास्तविक एकच वस्तू ठेवली आणि ती सर्वांनी घ्यावी म्हटले तर सर्वच एकट्याच्या हाती कशी येईल ? बायको म्हणते, "मी माहेरी सोळा वर्षे तपश्चर्या केली आणि आता यांच्या पदरात पडले, तेव्हा यांनी मला आता सुख द्यावे" पोरांना वाटते, "आमची इतकी पुण्याई म्हणून यांना इतका पगार झाला, तेव्हा यांनी नाही का आमचे लाड पुरवू ?" खरोखर, सुखाकरिताच प्रत्येकाची धडपड चाललेली असते; परंतु खरे सुख कशात आहे हे कळूनसुद्धा, आपण डोळ्यांवर कातडे ओढून घ्यावे, त्याप्रमाणे तिकडे दुर्लक्ष करीत असतो. प्रपंचात सुख मिळावे म्हणून, आपण जी चिकाटी धरतो, तिच्या एकचतुर्थांश चिकाटी जरी भगवंतासाठी आपण धरली तरी आपले काम भागेल. आनंदाच्या प्राप्तीसाठी आपण जे साधन आज करतो आहोत ते चुकीचे आहे. तात्पुरत्या सुखासाठी आपण आज धडपडत आहोत, त्यापासून दुःखच पदरात पडते. म्हणून तसे न करता, चिरकाल टिकणाऱ्या सुखासाठी आपण काही तरी साधन करावे. जगामध्ये प्रत्येक गोष्टीला बंधन आहे. प्रत्येकाचे नियम ठरलेले आहेत. त्या नियमांचे उल्लंघन करणे म्हणजे अनवस्था आणणे होय. त्याप्रमाणे कुटुंबामध्ये प्रत्येक माणसाचे कर्तव्य ठरलेले आहे. असे कर्तव्याचे वळण जिथे असते त्या घराला 'वळण आहे' असे म्हणतात. ज्या घरामध्ये वळण असते ते घर सुखी होईल. समजा, आपण एक घर बांधले, त्यामध्ये दरवाजे केले, भिंतीला खिडक्या केल्या, वर आढ्याला झरोके केले. आता त्यांपैकी झरोक्यांनी विचार केला की, 'आम्ही का म्हणून लहान असावे ? आम्ही दरवाज्यांइतकेच मोठे होणार !' असे म्हणून ते दरवाज्यांइतके मोठे झाले; खिडक्यांनीही तोच विचार केला, आणि त्या सगळ्या दरवाज्यांइतक्या मोठ्या बनल्या; असे झाल्यावर त्या घराचे काय होईल ? हे जसे योग्य नव्हे. तसे, ज्या घरामध्ये प्रत्येकजण आपलेच मत खरे म्हणतो, आणि जेथे वडील माणसांविषयी आदर नसतो, त्या घराचा विचका व्हायला वेळ लागत नाही.

**बोधवचन:- आपल्या घरातील वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे.**



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**काँग्रेसचे एक ज्येष्ठ आणि बुजुर्ग नेते हे खरेतर एक बुद्धिमान आणि विद्वान व्यक्तिमत्त्व! त्यांचे बंधू नावाजलेले पत्रकार आहेत. अय्यर, नटवरसिंग, डॉ. सुब्रमण्यम स्वामी, यशवंत सिन्हा हे राजकारणातील अयशस्वी नेतेच म्हणावे लागतील. अर्थात, त्याला त्यांचे स्वभावच कारणीभूत आहेत, असंच म्हणावं लागेल. यातील यशवंत सिन्हा हे समाजवादी विचारांचे.**

# मोठी परंपरा असलेल्या काँग्रेसची बिकट वाट !



### असेल तर सूत, नाहीतर भूत!

डॉ. सुब्रमण्यम स्वामी हिंदुत्ववादी असले तरी एखाद्याला पाण्यात बुडवून त्याचे नाकतोंड दाबायला कमी करणार नाहीत. एखादा माजलेला बैल औताला बांधला आणि तो शांत असेल तर एकट्याने सगळे शेत नांगरील, पण उधळला तर अख्खा बाजार उधळून लावील. भरपूर अभ्यास केल्यानंतर मिळालेल्या ज्ञानाचे करायचे काय? असा प्रश्न निर्माण होतो. तशी या मंडळींची परिस्थिती.. मग वयानुसार वैफल्य येऊ लागते. आज नटवरसिंग हयात नाहीत, पण बाकीचे सर्व विद्वान आहेत, पण कोपऱ्यात फेकले गेले आहेत !

### न ऐकलेला अय्यर यांचा बाउन्सर!

यामधील मणिशंकर अय्यर यांनी राजीव गांधी यांचा एका मुलाखतीत उल्लेख करताना ते केंब्रिज विद्यापीठात अनुत्तीर्ण झाले होते, असे सांगितले. पण, केंब्रिजमध्ये अनुत्तीर्ण होणे अवघड असते, असे ते म्हणाले. पुढे राजीव गांधी इंपिरियल वगैरे ठिकाणी गेले आणि तिथेही अनुत्तीर्ण झाले, असे अय्यर यांनी म्हटले आहे. यावर काँग्रेस पक्षातून प्रतिक्रिया येणे स्वाभाविक आहे. नेहरु-गांधी घराण्याच्या संदर्भात लेखन करणारे लोक वस्तुनिष्ठ भूमिका घेत नाहीत. परिणामी लोकशाहीच्या सगळ्या प्रश्नांवर हे घराणे हा एकमेव उपाय आहे, यावर काँग्रेसच्या नेत्यांचा भर असतो.

### काँग्रेसची अत्यंत वाईट अवस्था

अय्यर यांनी जे सांगितले त्यातून एक वास्तव पुढे आले, ते म्हणजे नेहरु-गांधी घराण्यावर सगळा भार टाकून काँग्रेसची सगळी मंडळी निर्धास्त झाली. आता इतक्या वर्षांनी त्याचे परिणाम दिसत आहेत. कधीतरी शेतात गेल्यानंतर पायात काटा शिरतो आणि तो तसाच आत राहून उतारवयात रंग दाखवतो. तशी काँग्रेसची आज परिस्थिती आहे.

### नेहरूंना जबाबदारी मिळाली अन्..

या बाबतीत नेहरु किंवा इंदिरा गांधी यांना दोष देणे योग्य ठरणार नाही. पण त्या वेळची परिस्थिती लक्षात घेतली, तर त्याचे विश्लेषण मात्र करता येईल. मुख्य म्हणजे महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर काँग्रेस पक्षाकडे नेत्यांची कमतरता नव्हती. पण, गांधींचे राजकीय वारस म्हणून नेहरुंच्या नावावर शिक्का बसला होता. सरदार वल्लभभाई पटेल यांची तब्येत त्या काळात फारशी चांगली नव्हती. गांधींच्या हत्येनंतर जेव्हा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याची वेळ आली, तेव्हा पुरुषोत्तमदास टंडन हे नेहरुंच्या उत्तर प्रदेश या राज्यातील नेते अध्यक्ष झाले. आचार्य कृपलानी नेहरुंच्या बरेचसे जवळचे. ते पराभूत झाले. सरदार पटेल यांना तब्येतीची साथ मिळाली नाही आणि ते १९५० मध्ये निधन पावले. मग नेहरु हे काँग्रेसचे अनभिषिक्त नेते झाले आणि नंतर पुरुषोत्तमदास टंडन यांची तीन वर्षांची मुदत संपण्याची आधी नेहरु यांच्याकडे काँग्रेसचे अध्यक्षपद आले.

### नेहरूंचा एकछत्री अंमल..

मग, जवाहरलाल नेहरु यांचा एकछत्री अंमल देशावर सुरु झाला. नेहरु आणि गांधी घराण्यातील नेत्यांच्या आजूबाजूला खुषमस्करे जमा होऊ लागले. त्या वेळच्या घटना परिषदेत अगदी तरुण वयात काम करण्याची संधी मिळालेले देवकांत बरुआ हे सगळ्यांना आठवत असतील. त्यांनीच पुढे 'इंदिरा ईज इंडिया' अशी घोषणा देऊन आपली भक्ती सिद्ध केली होती. मग, अनेक घराणी काँग्रेसच्या परिवारात दाखल झाली आणि ती घराणी पुढच्या एकदोन पिढ्या राजकीय सत्तेच्या तलावात मस्तपैकी मनसोक्त डुंबली, अजून सुद्धा स्तुती सुमने उधळत आहेत पण सत्ता हातात नाही!

### राजीव यांच्याकडे जबरदस्तीने पद

एवढे विस्ताराने लिहिण्याचा उद्देश हा की गांधी घराणे हेच आपले तारणहार असे देशभरातील काँग्रेसजन समजत राहिले आणि १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर सहानुभूतीच्या लाटेवर राजीव गांधी यांना बळजबरीने स्वार होऊन पंतप्रधान होण्यावाचून पर्याय उरला नाही. परिस्थिती अशी होती की त्या वेळी राजीव गांधी यांना पंतप्रधान करण्यावाचून काँग्रेस पक्षाकडे दुसरा पर्याय नव्हता.

### अय्यर यांचा संदर्भ..

..आणि राजीव गांधी यांनी पंतप्रधान झाल्यानंतर सुरुवातीला जो प्रचंड वेग धारण केला होता, तो वर्षभरात एकदम कमी झाला आणि काँग्रेसची घसरण सुरु झाली. अय्यर म्हणतात त्याचा संदर्भ इथे येतो. राजीव गांधी जरी पायलट असले तरी राजकारणात अननुभवी होते, हे वास्तव नाकारता कसे येईल? प्रदीर्घ अनुभव असलेल्या पी व्ही नरसिंहराव, प्रणव मुखर्जी, के.करुणाकरन, व्ही. पी.सिंग अशा नेत्यांना राजीव गांधी यांच्या हाताखाली काम करावे लागले. राजीव गांधी यांचे औपचारिक असे शिक्षण आणि प्रशिक्षण झाले नव्हते. नेहरुंच्या काळात इंदिरा गांधी यांना जे मुक्त असे प्रशिक्षण मिळाले. काँग्रेस पक्ष तेव्हा नेहरु यांची वैयक्तिक मालमत्ता होती. पक्षात अन्य समकालीन नेते होते, परंतु, काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांना थोडेफार महत्त्व होते. इंदिरा गांधी यांच्या काळात तेही कमी झाले, ही वस्तुस्थिती!

### आयत्या पिठावर रेघोट्या..

मणिशंकर अय्यर यांनी राजीव गांधी यांच्या संदर्भात जे सांगितले, ते वास्तव म्हणून त्याकडे त्रयस्थपणे बघणे योग्य ठरेल. राजीव गांधी यांची कारकीर्द संजय गांधी यांच्या निधनानंतर सुरु झाली. आईला मदत करण्याच्या भावनेने ते आले, पण काँग्रेसच्या त्या काळातील नेत्यांनी त्यांच्या गळ्यात सगळी जबाबदारी दिली. दुर्दैवाने मते मिळविण्याची राजीव गांधी यांची शक्ति देखील ते पंतप्रधान झाल्यानंतर वर्षभरात घटू लागली. याला त्यांचे शिक्षण, अय्यर म्हणतात तसे झालेले नव्हते, हे कारण नाही तर त्यांना आवश्यक तो अनुभव मिळाला नाही, हे आहे. थोडक्यात, राजकीय पक्ष चालवताना भावी काळात नवे नेतृत्व उभे राहणे आवश्यक असते आणि पक्षीय पातळीवर त्याची उभारणी आवश्यक असते. गांधी घराण्याला अशी संघटना वगैरे बांधणे आवश्यक असते, हेच माहिती नसावे. म्हणून आज काँग्रेस पक्ष स्वतः विकसित होण्यासाठी पावले न टाकता सत्ताधारी पक्ष आपोआप अयशस्वी होईल आणि मग आपणच सत्ताधारी होऊ अशा भ्रमात आहे. ज्यांनी प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर प्रयत्न करायला हवे होते त्या राजीव गांधींनी आयत्या पिठावर रेघोट्या ओढल्या ! निवडणुका आल्या की नेहरू गांधी घराण्याकडे डोळे लावून बसणे, त्यांच्याकडून काही चुका झाल्या तरी त्यावर पांघरूण घालणे आणि कोणतीही ठोस भूमिका न घेता आलेला दिवस ढकलणे ही शिकवण नेहरू गांधी घराण्याने दिली आहे आणि तीच परंपरा पुढे चालू आहे. याउलट कडक प्रशासन आणि शिस्तबद्धता पाळून भारतीय जनता पक्ष रोज उत्तुंग भरारी घेत आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असलेलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भाजपा खासदाराला अटक का नाही?

## व्हिडीओ शेअर संजय राऊतांचा करत संतप्त सवाल

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**समाजवादी पार्टीचे नेते आणि मानखुर्द-शिवाजीनगरचे आमदार अबू आझमी यांनी मुघल शासक औरंगजेबाबत केलेल्या एका वक्तव्यानंतर मोठा वाद झाला होता. विधानसभेत झालेल्या गोंधळानंतर त्यांचे निलंबन देखील करण्यात आले. ‘औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता’ असं वक्तव्य अबू आझमी यांनी केले होते. दरम्यान याच मुद्द्यावर आता शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी सत्ताधारी पक्षांना काही प्रश्न विचारले आहेत. शिवरायांचा अपमान करणाऱ्या भाजपाच्या नेत्यांना वेगळा कायदा आहे का? असा थेट सवाल संजय राऊत यांनी विचारला आहे.**



### आझमी काय म्हणाले होते?

सुधांशु त्रिवेदी यांच्यावर देखील अबू आझमी यांच्याप्रमाणे कारवाई झाली पाहिजे असे म्हटले आहे. इतकेच नाही तर त्यांना अटक का झाली नाही असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये राऊतांनी अबू आझमी यांच्यावर झालेल्या कारवाईबद्दल आनंद व्यक्त केला आहे. “अबू आझमी वर कारवाई झाली! एकदम कडक! मस्त! पण छत्रपती शिवाजी राजांना माफीवीर म्हणणाऱ्या या अतिशहाण्या भाजपा खासदारावर गुन्हा दाखल करून अटक का झाली नाही?,” असे राऊत म्हणाले आहेत. “अजूनही वेळ गेलेली नाही!

भाजपाचे नेते आणि राज्यसभा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी काही दिवसांपूर्वी शिवरायांबद्दल वादग्रस्त विधान केले होते, यानंतर मोठा गदारोळ झाला होता. या पार्श्वभूमीवर संजय राऊतांनी सुधांशु त्रिवेदी यांच्या त्या वक्तव्याचा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर शेअर केला आहे. तसेच त्यांनी सुधांशु त्रिवेदी यांच्यावर देखील अबू आझमी यांच्याप्रमाणे कारवाई झाली पाहिजे असे म्हटले आहे. इतकेच नाही तर त्यांना अटक का झाली नाही असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये राऊतांनी अबू आझमी यांच्यावर झालेल्या कारवाईबद्दल आनंद व्यक्त केला आहे.“अबू आझमी वर कारवाई झाली! एकदम कडक! मस्त! पण छत्रपती शिवाजी राजांना माफीवीर म्हणणाऱ्या या अतिशहाण्या भाजपा खासदारावर गुन्हा दाखल करून अटक का झाली नाही?,” असे राऊत म्हणाले आहेत.“अजूनही वेळ गेलेली नाही! कोरटकर, सोलापुरकर आणि या सुधांशू त्रिवेदी सारख्यांना देखील आझमीचा न्याय का नाही? शिवरायांचा अपमान करणाऱ्या भाजपा वाल्यांना वेगळा कायदा आहे काय?,” असेही राऊत म्हणाले आहेत.खासदार संजय राऊत यांनी अन्सर इम्रान एसआर नावाच्या वापरकर्त्याने केलेली पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये या वापरकर्त्याने सुधांशू त्रिवेदी यांच्या त्या वादग्रस्त विधानाचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. ज्याला त्यांनी कॅप्शन दिले आहे की, “जर औरंगजेबावर बोलल्याने अबू आसिम आझमी यांच्या आमदारकीवर तलवार लटकू शकते आणि त्यांच्या अटकेची चर्चा होऊ शकते तर त्याआधी सत्ताधारी भाजपाचे राजसभा सदस्य सुधांशु त्रिवेदी यांच्यावर खटला दाखल व्हावा.”महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आझमी यांनी औरंगजेबाचे उदात्तीकरण करणारे वक्तव्य केले होते. औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता, तसेच छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी औरंगजेबाचा वाद धार्मिक नव्हता तर राजकीय वैमनस्यातून त्यांची हत्या झाल्याचे वक्तव्य आझमी यांनी केले होते.आझमी यांच्या या वक्तव्यावर सत्ताधारी आणि विरोधकांनीही तीव्र आक्षेप घेत कारवाईची मागणी केली होती. सत्ताधारी महायुतीच्या सदस्यांनी मंगळवारी आझमी यांच्यावर निलंबन आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करीत विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज बंद पाडले होते. त्यानंतर आझमी यांनीही आपले वक्तव्य मागे घेत छत्रपती संभाजी महाराजांच्या अवमानाबद्दल माफी मागितली. तसेच औरंगजेबाच्या उदात्तीकरणाचा हेतू नव्हता आणि महापुरुषांचा अवमानही आपण केला नसल्याचा दावा आझमी यांनी केला. दरम्यान संसदीय कार्यमंत्री चंद्रकात पाटील यांनी याबाबत मांडलेला प्रस्ताव विधानसभेत मंजूर करण्यात आला आणि अबू आझमी यांचे बुधवारी अधिवेशनकाळापर्यंत निलंबन करण्यात आले आहे.भाजपाचे नेते आणि राज्यसभा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी काही दिवसांपूर्वी शिवरायांबद्दल वादग्रस्त विधान केले होते, यानंतर मोठा गदारोळ झाला होता.

# ‘ड्रायपोर्ट’ म्हणजे कुणाचा पायपोस कुणास नाही

## वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर खासदार डॉ. काळे यांचे मत

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**ड्रायपोर्ट कार्यान्वित करण्याच्या संदर्भात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ‘कुणाचाच पायपोस कुणास नाही’ अशी परिस्थिती अनुभवास आली, असे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी शुक्रवारी येथे सांगितले. येत्या वर्षभरात या ठिकाणी आवश्यक कामे पूर्ण होण्याचा अंदाजही त्यांनी वर्तवला.**



### अपूर्ण ड्रायपोर्टचे उद्घाटन

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर ड्रायपोर्टचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आले. वास्तविक हे काम अपूर्ण असल्याची माहिती दिली नसल्याने त्यांची दिशाभूल झाली असण्याची शक्यता आहे. घाईघाईत ड्रायपोर्टचे उद्घाटन उरकण्यात आले, त्यावेळी तेथे विद्युत पुरवठाही झालेला नव्हता.

ड्रायपोर्टमधील कामाची जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्यासह अन्य संबंधित अधिकाऱ्यांसोबत काळे यांनी पाहणी करून आढावा घेतला. त्यानंतर खासदार काळे म्हणाले की, ४२५ एकरवरील या प्रकल्पाचा ६३ एकरचा पहिला टप्पा सध्या विकसित करण्याचे नियोजन आह. दिनगाव स्थानक ते ड्रायपोर्ट दरम्यानचा रेल्वेमार्ग, संरक्षक भिंत इत्यादी कामे झालेली असून, गोदाम तसेच प्रशासकीय इमारतीचे काम सुरू आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत ड्रायपोर्ट कार्यान्वित होणार असे संबंधित अधिकारी म्हणत असले तरी आपल्याला त्यामध्ये तथ्य वाटत नाही. या ठिकाणच्या कामांवर आतापर्यंत २६९ कोटी रुपये खर्च झालेला आहे. यापैकी ११३ कोटी रुपये भूसंपादनासाठी १२० कोटी रुपये रेल्वेमार्ग आणि रस्त्यांवर खर्च झाले आहेत. याशिवाय अन्य कामांवर ३६ कोटी रुपये खर्च झालेले आहेत.जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) च्या वतीने उभारण्यात येणाऱ्या ड्रायपोर्टमधील मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क (एमएमएलपी) विकसित करून मालाची चढ-उतार आणि अन्य संबंधित कामे करण्याच्या संदर्भातील कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाशी (क्वॉन्कर) झालेला करार संपुष्टात आल्याची माहिती बैठकीस उपस्थित असलेल्या जिल्हा पातळीवरील एका वरिष्ठ अधिकाऱ्यालाही माहीत नव्हती. जालना परिसरात अगोदरच मोठ्या प्रमाणावर वायूप्रदूषण असून, ड्रायपोर्टमुळे त्यात आणखी भर पडू नये, याची दक्षता घेण्याची सूचना आपण संबंधित अधिकाऱ्यांना केली. संरक्षक भिंत उभारण्यात आली असली तरी तीन-चार ठिकाणी पडली आहे. जालना-छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर समृद्धी महामार्गास जोडणारा उड्डाणपूल ड्रायपोर्टच्या माध्यमातून करावा, अशी सूचना आपण केली असून, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यास अनुकूलता दर्शविली आहे. जालना, नाशिक येथील प्रकल्पासाठी ‘महाराष्ट्र मल्टिमॉडेल लॉजिस्टिक पार्क’ कंपनी स्थापन झालेली असून, त्या माध्यमातून ड्रायपोर्टमध्ये चढ-उताराचे काम होणार आहे.

# ए खून के प्यासे बात सुनो!

## गुजरात पोलिसांना सर्वोच्च न्यायालयाने का फटकारले?

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**महाराष्ट्रातून राज्यसभेत गेलेले उत्तर प्रदेशचे खासदार इम्रान प्रतापगढी यांच्या पक्षात झपाट्याने झालेल्या उदयाने काँग्रेसमधील अनेकांना आश्चर्यचकीत केले आहे. राज्यसभेचे खासदार असण्याव्यतिरिक्त, प्रतापगढी सध्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आहेत. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून आलेले ३७ वर्षांचे इम्रान प्रतापगढी हे एक कवीही आहेत.**

दरम्यान, प्रतापगढी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केल्यामुळे त्यांच्याविरोधात गुजरात पोलिसांनी एफआयआर नोंदवला होता. यामुळे गेल्या सोमवारी, सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरबद्दल गुजरात पोलिसांवर ताशेरे ओढले. त्यावेळी न्यायालयाने म्हटले की, "संविधान अस्तित्वात आल्यानंतर ७५ वर्षांनंतर तरी भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य काय असते हे किमान पोलिसांना तरी समजले पाहिजे."सरकारी वकिलांच्या म्हणण्यानुसार, इम्रान प्रतापगढी काही दिवसांपूर्वी गुजरातच्या जामनगर येथे एका लग्न समारंभात सहभागी झाले होते. यानंतर त्यांनी "ए खून के प्यासे बात सुनो" ही कविता पार्श्वभूमीत वाजवणारा एक व्हिडिओ अपलोड केला होता. यानंतर कवितेतील शब्द आक्षेपार्ह असल्याचा आरोप करण्यात आला होता.

तक्रारीवर कारवाई करताना, गुजरात पोलिसांनी ३ जानेवारी रोजी प्रतापगढी यांच्याविरुद्ध बीएनएसच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला.उत्तर प्रदेशातील प्रतापगढमधील शमशेरगंज बाजार गावात जन्मलेले प्रतापगढी हे सामान्य कुटुंबातील आहेत. त्यांचे वडील



मोहम्मद इलियास खान युनानी डॉक्टर आणि आई साजिदा खान गृहिणी आहेत. इम्रान यांनी प्रतापगढमधील एका शाळेत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी अलाहाबाद विद्यापीठातून २००८ मध्ये हिंदी साहित्यात पदव्युत्तर पदवी घेतली.

त्यांनी विद्यापीठातून पत्रकारितेचा डिप्लोमा देखील पूर्ण केला आहे. महाविद्यालयीन काळापासून त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली आणि हिंदी कवी संमेलनांमध्ये त्या सादर करायला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी उर्दू मुशायरांमध्ये भाग घेण्यास सुरुवात केली आणि लवकरच याद्वारे लोकप्रियता मिळवली, त्यांचा चाहता वर्ग आता देशभरात आणि परदेशातही पसरलेला आहे.प्रतापगढी यांच्या कवितांध्ये सामाजिक आणि राजकीय विषयांचाही समावेश आहे, ज्यामध्ये उपेक्षित आणि असुरक्षित घटकांच्या मुद्द्यांवर आवाज उठवण्यात आला आहे. राजकारणात येण्यापूर्वी, प्रतापगढी यांच्या कवितेचा एक प्रमुख विषय लिंचिंग होता.देशाच्या विविध भागांमध्ये लिंचिंगच्या विविध घटनांमध्ये ज्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांना गमावले त्यांना त्यांनी मदत केल्याचेही म्हटले जाते. २०१७ मध्ये, त्यांनी दिल्लीच्या जंतरमंतर येथे

### देशभरातून दूरदूरच्या ठिकाणांहून येतात

"जेव्हा इम्रान प्रतापगढी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात येतात आणि त्यांच्या कार्यालयात बसतात तेव्हा त्यांना भेटण्यासाठी तासनतास रांगेत उभे राहणारे अनेक लोक असतात. हे लोक देशभरातून दूरदूरच्या ठिकाणांहून येतात. आणि हे चित्र बहुतेकदा काही वरिष्ठ नेत्यांच्या कार्यालयाबाहेरील गर्दीपेक्षा मोठे असते.

लिंचिंगच्या विरोधात प्रतीकात्मक निषेध म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. ज्याला "लहू बोल रहा है" असे नाव दिले होते. इम्रान प्रतापगढी यांच्या कविता आणि सामाजिक कार्याने प्रभावित होऊन, काँग्रेसने त्यांना नोव्हेंबर २०१८ मध्ये तत्कालीन पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांच्या भेटीसाठी बोलावले होते. प्रतापगढी यांना राहुल गांधींना भेटण्यासाठी २० मिनिटे देण्यात आली होती, परंतु ही बैठक जवळजवळ दोन तास चालली, जिथे त्यांनी विविध राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर चर्चा केली.काही महिन्यांनंतरच, काँग्रेसने २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रतापगढी यांना मुरादाबाद मतदारसंघातून तिकीट दिले, जिथे ते ४.६२% मतांसह तिसऱ्या स्थानावर राहिले. तर, सपाचे एस.टी. हसन यांनी भाजपा उमेदवाराचा पराभव करून ही जागा जिंकली. यानंतर, पुढे जून २०२१ मध्ये काँग्रेसने प्रतापगढी यांना पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्त केले. जुलै २०२२ मध्ये, ते महाराष्ट्रातून काँग्रेसचे उमेदवार म्हणून राज्यसभेवर निवडून आले आणि वरिष्ठ सभागृहातील सर्वात तरुण सदस्यांपैकी एक बनले. संसदेतील त्यांची भाषणे पद्यांनी भरलेली असतात. ते काँग्रेस वर्तुळातही लोकप्रिय आहेत.

---

# भाजपाने दिला सर्वोच्च न्यायालयाचा दाखला

## बंगाली वंशाच्या मुस्लिमांसाठी "मियाँ" एक अपमानजनक शब्द

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**आसाममधील बंगाली वंशाच्या मुस्लिमांसाठी "मियाँ" एक अपमानजनक शब्द आहे आणि बऱ्याचदा तो राज्यातील वादांच्या मुळाशी असतो. आता, हा शब्द विधानसभेतही पोहचला आहे. सत्ताधारी भाजपा नेत्यांनी या शब्दाचा विधानसभेत वापर केल्याने या आठवड्यात सलग दोन दिवसांसाठी सभागृहाचे कामकाज थांबवण्यात आले आहे.**

विरोधी पक्षाच्या नेत्यांनी "मियाँ" या शब्दाच्या वापरावर आणि राज्यात अशी विधाने करणे



राजकीय संस्कृतीचा भाग बनत असल्याबद्दल निषेध व्यक्त केला आहे. तर दुसरीकडे भाजपाने सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील आदेशाचा दाखला दिला आहे. ज्यामध्ये, "एखाद्या व्यक्तीला "मियाँ-तियाँ" आणि "पाकिस्तानी" म्हणणे "वाईट" असू शकते परंतु ते धार्मिक भावना दुखावणारा गुन्हा नाही. मंगळवारी, आरोग्य आणि कुटुंब कल्याण आणि पाटबंधारे मंत्री अशोक सिंघल यांनी त्यांच्या मतदारसंघातील ढेकियाजुली येथे एका कार्यक्रमात केलेल्या

### अध्यक्षांनी प्रस्ताव फेटाळून लावला

माझ्या मतदारसंघात असे होऊ शकत नाही," असे मंत्री व्हिडिओमध्ये म्हणताना ऐकू येते.मंगळवारी विधानसभेत एआययूडीएफचे आमदार रफीकुल इस्लाम यांनी सिंघल यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाचा प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला, परंतु नियमांनुसार प्रस्तावाच्या आवश्यकता पूर्ण होत नसल्याने अध्यक्षांनी तो प्रस्ताव फेटाळून लावला.

विधानांबद्दल चर्चा सुरू असताना विधानसभा पहिल्यांदा २० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आली होती. त्यानंतर विशेषाधिकार भंग प्रस्तावासाठी आग्रह धरल्याने ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटच्या सर्व आमदारांना निलंबित करण्यात आले. आसामच्या नव-वैष्णव परंपरेतील धार्मिक संदेश देणारे पारंपारिक नृत्यनाट्य - भाओना कार्यक्रमात बोलताना सिंघल "मियाँ" लोकांना दुकाने लावू देऊ नका असे सांगत असल्याचे एका व्हिडिओमध्ये ऐकू येते. "आपली मुले ईदमध्ये जात नाहीत. प्रत्येकाची स्वतःची जागा असते. तुमचे स्वतःचे जेवण असते, तुमचे स्वतःचे कपडे असतात, तुमच्या स्वतःच्या परंपरा असतात. त्यांच्या स्वतःच्या परंपरा असतात आणि तुम्ही त्यांना येथे दुकाने लावू देता.

# 'लग्नानंतर होईलच प्रेम': घटस्फोट देणार नाही!

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'लग्नानंतर होईलच प्रेम' ही मालिका सध्या घराघरात चांगलीच चर्चेत आहे. यामागचं मुख्य कारण म्हणजे या मालिकेत नुकताच आलेला ट्विस्ट. खरंतर, मालिकेचं कथानक काय असणार याचा अंदाज पहिला टीझर पाहून आधीपासूनच सर्वांना होता. मात्र, आता प्रत्यक्ष तो सीक्वेन्स पाहताना सगळेजण चक्रावून गेले आहेत. पार्थ-नंदिनीचं ठरलेलं लग्न मोडतं. नंदिनीला ऐनवेळी लग्नमंडपातून किडनॅप केलं जातं. त्यानंतर बहीण पळून गेल्याचा ठपका ठेवत काव्याला



पार्थबरोबर लग्न करण्यास भाग पाडलं जातं. आई-बाबांच्या आदराखातर काव्या पार्थबरोबर लग्न करण्यास तयार होते. तिथे नंदिनीला गुंडांनी किडनॅप केलेलं असतं. ऐनवेळी तिथे जीवा पोहोचतो आणि गुंडांच्या तावडीतून नंदिनीची सुटका करतो. नंदिनी आणि जीवा लग्नमंडपात पोहोचतात तोवर पार्थ-काव्या विवाहबंधनात अडकलेले असतात. सगळेजण नि:शब्द होतात. काव्या जीवाच्या आठवणीत फक्त रडत असते.यानंतर मालिकेत आणखी एक ट्विस्ट येतो... नंदिनीवर देखील त्याच दिवशी लग्न करण्याचा दबाव टाकला जातो. यावेळी तिच्या बाजूने कोणीही ठामपणे उभं राहत नाही. पण, जीवा यावेळी तिला धीर देतो आणि सर्वांसमोर 'मी नंदिनीचा स्वीकार करतोय' असं सांगतो. काव्या-पार्थ आणि जीवा-नंदिनी एकमेकांशी लग्न करतात. अर्थात या चौघांची लग्न एकमेकांच्या मनाविरुद्ध झालेली असतात.

# प्रियाची भावुक पोस्ट

'काकस्पर्श', 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', 'हॅप्पी जर्नी', 'टाइम प्लीज', 'आम्ही दोघी', 'वजनदार' अशा अनेक मराठी चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री म्हणजे प्रिया बापट (PRIYA BAPAT). मराठी सिनेसृष्टीबरोबरच प्रिया बॉलीवूड विश्वातही चांगलीच लोकप्रिय आहे. बालकलाकार म्हणून आपल्या करिअरची सुरुवात करणाऱ्या प्रियाने (PRIYA BAPAT) मालिका, चित्रपट, नाटक व वेब सीरिज अशा वेगवेगळ्या माध्यमांमध्ये काम करीत आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. त्याशिवाय प्रियाने निर्माती म्हणूनही काम करण्यास सुरुवात केली आहे. अभिनय व निर्मिती या क्षेत्रांत सक्रिय असण्याबरोबरच प्रिया सोशल मीडियावरही चर्चेत असते.सोशल मीडियावर प्रिया (PRIYA BAPAT) आपले अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करीत चाहत्यांच्या संपर्कात राहते. तिच्या या फोटो व व्हिडीओला चाहत्यांकडूनही चांगलाच प्रतिसाद मिळतो. त्याशिवाय सोशल मीडियाद्वारे ती आपल्या कामाबद्दलची माहितीदेखील शेअर करीत असते. अशातच अभिनेत्रीने आपल्या आईसाठी एक भावुक पोस्ट शेअर केली आहे. आज प्रियाच्या आईचा वाढदिवस असून, आपल्या आईच्या आठवणीत एक जुना फोटो तिने शेअर केला आहे. या फोटोसह तिने एक भावुक पोस्टदेखील लिहिली आहे.आईबरोबरचा फोटो शेअर करीत प्रियाने (PRIYA BAPAT) "वाढदिवसाच्या शुभेच्छा, आई. मला तुझी खूप आठवण येते. मला माहीत आहे की, तू माझ्यावर कायम लक्ष ठेवत आहेस", असे म्हटले आहे. प्रियाने काही वर्षांपूर्वीच आपल्या आईला गमावले. ती अनेकदा आपल्या अनेक पोस्ट किंवा मुलाखतींमधून आईबद्दलच्या आठवणी व्यक्त करताना दिसते. अशातच तिने नुकतीच शेअर केलेली पोस्ट सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. प्रियाने शेअर केलेल्या या पोस्टला चाहत्यांनी लाइक्स व कमेंट्स करीत प्रतिसाद दिला आहे. अभिनेता



अभिजीत केळकर, अभिनेत्री शर्वरी लोहकरे या कलाकारांसह अनेक चाहत्यांनी प्रियाच्या पोस्टवर कमेंट्स केल्या आहेत आणि तिला धीर देण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, प्रियाच्या कामाबद्दल बोलायचे झाले, तर ती नुकतीच 'विस्फोट' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. त्याशिवाय रंगभूमीवर तिचे (PRIYA BAPAT) व उमेशचे (UMESH KAMAT) 'जर तरची गोष्ट' हे नाटक सुरू आहे. प्रेक्षकांकडून या नाटकाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.'काकस्पर्श', 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', 'हॅप्पी जर्नी', 'टाइम प्लीज', 'आम्ही दोघी', 'वजनदार' अशा

अनेक मराठी चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री म्हणजे प्रिया बापट (PRIYA BAPAT). मराठी सिनेसृष्टीबरोबरच प्रिया बॉलीवूड विश्वातही चांगलीच लोकप्रिय आहे. बालकलाकार म्हणून आपल्या करिअरची सुरुवात करणाऱ्या प्रियाने (PRIYA BAPAT) मालिका, चित्रपट, नाटक व वेब सीरिज अशा वेगवेगळ्या माध्यमांमध्ये काम करीत आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. त्याशिवाय प्रियाने निर्माती म्हणूनही काम करण्यास सुरुवात केली आहे. अभिनय व निर्मिती या क्षेत्रांत सक्रिय असण्याबरोबरच प्रिया सोशल मीडियावरही चर्चेत असते. सोशल मीडियावर प्रिया (PRIYA BAPAT) आपले अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करीत चाहत्यांच्या संपर्कात राहते. तिच्या या फोटो व व्हिडीओला चाहत्यांकडूनही चांगलाच प्रतिसाद मिळतो. त्याशिवाय सोशल मीडियाद्वारे ती आपल्या कामाबद्दलची माहितीदेखील शेअर करीत असते. अशातच अभिनेत्रीने आपल्या आईसाठी एक भावुक पोस्ट शेअर केली आहे. आज प्रियाच्या आईचा वाढदिवस असून, आपल्या आईच्या आठवणीत एक जुना फोटो तिने शेअर केला आहे. या फोटोसह तिने एक भावुक पोस्टदेखील लिहिली आहे.

# आलिया भट्ट-रणबीर कपूरने दुसऱ्या मुलाचं ठरवलं नाव!

बॉलीवूडची लोकप्रिय स्टारकिड्स राहा कपूरने आपल्या गोड अंदाजाने अनेकांची मनं जिंकली आहेत. आलिया भट्ट आणि रणबीर कपूरचा जितका चाहता वर्ग आहे, तितकाच मोठा चाहता वर्ग राहाचा झाला आहे. तिचा प्रत्येक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतं असतो. राहा कधी पापाराझींना बाय, बाय करताना, तर कधी फ्लाइंग किस देताना दिसते. पण, राहाच्या आई-बाबाने म्हणजेच आलिया भट्ट-रणबीर कपूरने दुसऱ्या मुलाचं नाव ठरवलं आहे? हे तुम्हाला माहितीये का? नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये आलिया भट्टने राहाच्या नावामागची गोष्ट सांगत मुलाच्या नावाचा किस्सा सांगितला.काही दिवसांपूर्वी आलिया भट्टने जय शेट्टीच्या पॉडकास्टवर हजेरी लावली होती. यावेळी आलियाने राहाच्या नावामागची संपूर्ण गोष्ट सांगितली. राहाच्या जन्माआधीच मुलगी आणि मुलाच्या नावाचा आलिया-रणबीरने विचार केला होता. राहाच्या आधी दोघांना मुलाचं नाव खूप जास्त आवडलं होतं. आलिया भट्ट म्हणाली, "मी आणि रणबीर आम्ही दोघं उत्साही आई-बाबासारखे नावाबाबतीत चर्चा करायचो. आमच्या कुटुंबाचा एक ग्रुप आहे. तिथे सर्व कुटुंबातील सदस्यांना मुली व मुलांचं नाव सुचवण्यासाठी सांगितलं होतं. कारण आम्ही मुलगी किंवा मुलगा या दोन्हीसाठी तयार होतो. आम्ही एका मुलीचं नाव आणि एका मुलाचं नाव निवडलं होतं. त्यावेळी आम्हाला एका मुलाचं नाव खूप आवडलं होतं. आम्ही ठरवलं, हे नाव मुलासाठी खूप चांगलं आहे; ज्याचा मी आता खुलासा करू शकत नाही."पुढे आलिया भट्ट म्हणाली, "माझी सासू, रणबीरच्या आईने राहा नाव कसं वाटतं असं विचारलं? जर मुलगा झाला तर त्यालादेखील हे नाव शोभेल, असं त्या म्हणाल्या होत्या. राहा नाव हे मुलगी व मुलासाठी खरं चांगलं होतं. त्यांनी बरीच नावं सुचवली. पण रणबीर आणि मला राहा नाव आवडलं होतं. त्यामुळे आमच्याकडे दोन नावं ठरवली होती. त्यामुळे मुलगी असो किंवा मुलगा नाव निश्चित झालं होतं."दरम्यान, मुलाच्या नावाचा खुलासा न केल्यामुळे सध्या आलिया भट्ट आणि रणबीर कपूर पुन्हा एकदा आई-बाबा होणार असल्याची चर्चा सुरू आहे. 'हम दो हमारे दो' असं संपूर्ण कुटुंब करण्याचा दोघांचा विचार असल्याचं म्हटलं जात आहे. कामाबद्दल बोलायचं झालं तर, आलिया व रणबीर पुन्हा एकत्र लवकरच मोठ्या पडद्यावर झळकणार आहेत. प्रसिद्ध दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर' चित्रपटात दोघं पाहायला मिळणार आहे. याशिवाय 'ब्रह्मास्त्र २' चित्रपटातही आलिया व रणबीर दिसणार आहेत.

# आधी तुमच्या क्रिकेट बोर्डाला विचारा!

## दुबई-पाकिस्तान वेळापत्रकावरून नेटिझन्स भिडले!

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेमध्ये टीम इंडियाच्या दमदार कामगिरीची चर्चा आहे. पण त्याचवेळी या कामगिरीसाठी टीम इंडियाच्या पथ्यावर पडणारं स्पर्धेचं वेळापत्रक कारणीभूत असल्याचा दावा अनेक सहभागी संघांच्या आजी-माजी खेळाडूंकडून केला जात आहे. यात पाकिस्तान, द. आफ्रिका, इंग्लंड या संघांच्या खेळाडूंचा प्रामुख्याने समावेश आहे.**




भारतीय संघासाठी खरंच फायदेशीर ठरलं का?वेळापत्रक खरंच लादलं गेलं का? अशा मुद्द्यांवरून नेटिझन्स सोशल मीडियावर भिडल्याचं पाहायला मिळत आहे.यंदाच्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं यजमानपद पाकिस्तानकडे गेलं. मात्र, आधीच ठरलेल्या धोरणानुसार भारतानं पाकिस्तानमध्ये स्पर्धेसाठी संघ पाठवण्यास नकार दिला. शेवटी भारताचे सर्व सामने दुबईत खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे भारताशी ज्या संघांचे सामने होतील किंवा होऊ शकतील त्या सर्व संघांना पाकिस्तान ते दुबई आणि मग पुन्हा पाकिस्तान असा वारंवार प्रवास करावा लागला. भारत अंतिम फेरीत पोहोचल्यामुळे पाकिस्तान यजमान देश असूनही अंतिम सामना देशाबाहेर दुबईत खेळवण्याची वेळ पाकिस्तानवर आली.दुबई न सोडण्याची बाब टीम इंडियाच्या पथ्यावर पडल्याचं बोललं जात असून दुसरीकडे इतर संघांवर वारंवार करावा लागणारा प्रवास आणि त्याअनुषंगाने वेगवेगळ्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची वेळ ही बाब इतर संघांसाठी त्रासदायक ठरल्याचा दावा केला जात आहे.दरम्यान, या मुद्द्यावरून आता नेटिझन्समध्ये तुफान चर्चा सुरू झाली आहे. इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू अयान पाँट यानं “आयसीसीचं आणि भविष्यातील कोणत्याही जागतिक स्पर्धेचं महत्त्व कायम राखायचं असेल, तर आता कोणत्याही एका देशाच्या अनुषंगाने आयसीसीच्या स्पर्धांची व्यवस्था बदलता कामा नये. ही बाब चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दिसतेय. एकतर तुम्ही न्याय्य नियमांनी खेळा किंवा खेळूच नका”, अशी पोस्ट केली आहे. यावर एका युजरनं “स्पर्धेचं वेळापत्रक स्पर्धा सुरू होण्याच्या खूप आधीच जाहीर झालं होतं, तेव्हा कोणत्याही देशाच्या क्रिकेट बोर्डानं त्यावर आक्षेप घेतला नाही. मग आत्ताच का रडारड करतायत? वेळापत्रक जाहीर झालं तेव्हाच बोलायला हवं होतं”, असा मुद्दा मांडला आहे.दरम्यान, एका युजरनं स्पर्धेआधी वेळापत्रक ठरवण्याच्या आयसीसीच्या बैठकीला सर्व सदस्य देशाच्या क्रिकेट बोर्डाचे सदस्य उपस्थित होते, सगळ्यांनी या वेळापत्रकाला सहमती दर्शवली होती, त्यामुळे आधी तुमच्या देशांमधल्या क्रिकेट बोर्डांना प्रश्न विचारा, अशी पोस्ट केली आहे.एका युजरनं टीम इंडियानं अधिकाधिक सामने खेळावेत यासाठीच आयसीसीनं २०१५ नंतर भारताला सर्व स्पर्धांमध्ये कमकुवत गटात ठेवल्याचा दावा केला आहे.

### वेळापत्रक खरंच लादलं गेलं का?

“२०२४ मध्ये टी २० सेमीफायनल गयानात ठेवण्यात आली. सर्व सामने भारताच्या वेळापत्रकानुसार ठरवले. भारताचे ८० टक्के सामने शनिवार-रविवारी आयोजित होतात. यंदाही चॅम्पियन्स ट्रॉफीचे सर्व सामने दुबईत आयोजित केले गेले”, असा दावा केला आहे.एकीकडे अंतिम सामन्यात भारत विरुद्ध न्यूझीलंडमधील संभाव्य विजेत्याबाबत अंदाज बांधले जात असताना दुसरीकडे टीम इंडियाच विजयी व्हावी या दृष्टीने नियोजन केल्याचे दावे केले जात आहेत आणि सोशल मीडियावर यावरून तुफान चर्चा पाहायला मिळत आहे. भारतीय संघासाठी खरंच फायदेशीर ठरलं का?वेळापत्रक खरंच लादलं गेलं का? अशा मुद्द्यांवरून नेटिझन्स सोशल मीडियावर भिडल्याचं पाहायला मिळत आहे.यंदाच्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं यजमानपद पाकिस्तानकडे गेलं. मात्र, आधीच ठरलेल्या धोरणानुसार भारतानं पाकिस्तानमध्ये स्पर्धेसाठी संघ पाठवण्यास नकार दिला.

# भारतीय संघ एक पाऊल पुढे!

## चॅम्पियन्स करंडक: अंतिम सामन्याबाबत केन विल्यम्सनचे मत

।नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतील आपले सर्व सामने दुबईत खेळल्याने तेथील परिस्थिती आणि खेळपट्ट्यांची त्यांना पुरेशी कल्पना आली आहे. ते अचूक योजनेसह खेळत असून अंतिम फेरीच्या दृष्टीने भारतीय संघ एक पाऊल पुढे आहे असे म्हणता येऊ शकेल. मात्र, आम्हीही पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरू, असे वक्तव्य न्यूझीलंडचा अनुभवी फलंदाज केन विल्यम्सनने केले.**




यजमानपद पाकिस्तानकडे असले, तरी भारताचे सर्व सामने दुबई येथे खेळवले जात आहे. भारतीय संघाने अंतिम फेरी गाठल्याने आता जेतेपदाची लढतही दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे. रविवारी होणाऱ्या या लढतीत भारतासमोर तुल्यबळ न्यूझीलंडचे आव्हान असेल. भारताने आतापर्यंत चारही लढती जिंकल्या असून यात न्यूझीलंडवरील विजयाचाही समावेश आहे. न्यूझीलंडने या स्पर्धेतील आपले चारपैकी तीन सामने पाकिस्तानात खेळले आहेत. बुधवारी लाहोर येथे झालेल्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडने विक्रमी धावसंख्या उभारत दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले. मात्र, अंतिम लढत दुबईत खेळावी लागण्याबाबत विल्यम्सनला कोणतीही तक्रार नाही. “भारतीय संघाने आता सलग चार सामने दुबईत खेळले आहेत. त्यामुळे तेथे कसे खेळायचे याची त्यांना पुरेशी कल्पना आली आहे. मात्र, आमच्याबाबतीतही हेच म्हणू शकतो. आम्ही अलीकडच्या काळात पाकिस्तानात बरेच सामने खेळले. लाहोर येथे खेळण्याचा आम्हाला अनुभव होता. याचा आम्हाला उपांत्य फेरीत फायदा झाला असेही म्हटले जाऊ शकते. मात्र, हा खेळाचा भागच आहे. तुम्ही तक्रार करत राहणे योग्य नाही,” असे विल्यम्सन म्हणाला.भारताने सर्व सामने एकाच मैदानावर खेळले याबाबत आम्ही काहीच करू शकत नाही. पुढील सामन्यावर लक्ष केंद्रित करणे इतकेच आमच्या हातात आहे. सामन्याचे ठिकाण, प्रतिस्पर्धी या सर्व गोष्टी नक्कीच महत्त्वाच्या असतात. मात्र, आम्ही याआधी दुबईत भारताविरुद्ध सामना खेळला आहे. तेथील परिस्थिती पाकिस्तानपेक्षा वेगळी आहे. परंतु आम्ही भारताविरुद्धच्या साखळी सामन्यात ज्या गोष्टी चांगल्या केल्या.

### दुबईत सामना खेळण्याचा अनुभव

त्या लक्षात ठेवून अंतिम सामन्याची तयारी केली पाहिजे. आम्ही या सामन्यात पूर्ण तयारीनिशी उतरू हे नक्की,” असे विल्यम्सनने नमूद केले.चॅम्पियन्स करंडकाच्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेवर मात केली. विल्यम्सन आणि रचिन रवींद्र या दोघांनीही शतक साकारत न्यूझीलंडच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. रचिनचे ‘आयसीसी’च्या स्पर्धेतील हे पाचवे शतक ठरले. त्यामुळे अंतिम सामन्यानंतर विल्यम्सनने रचिनचे कौतुक करताना ‘अलौकिक प्रतिभा असलेला खेळाडू’ असे संबोधले. “रचिनबरोबर फलंदाजी करताना नेहमीच मजा येते. तो संघाच्या यशाला प्राधान्य देतो. तो मोकळेपणाने फटकेबाजी करतो. हीच गोष्ट त्याला खूप खास बनवते. त्याच्यात खूप आत्मविश्वास आहे. मोठ्या स्पर्धांमध्ये त्याने आपल्यातील अलौकिक प्रतिभा वारंवार दाखवून दिली आहे. त्याचे भविष्य उज्ज्वल आहे,” असे विल्यम्सन म्हणाला. पाकिस्तानच्या तुलनेत दुबईतील परिस्थिती निश्चितपणे वेगळी आहे. मात्र, मोठ्या स्पर्धांत खेळताना तुम्हाला वेगवेगळ्या परिस्थितीसाठी तयार राहावेच लागते. भारताविरुद्ध दुबईत सामना खेळण्याचा आम्हाला अनुभव आहे आणि हे आमच्यासाठी नक्कीच फायदेशीर ठरू शकेल. त्या सामन्यात केलेल्या चांगल्या गोष्टी पुढे घेऊन जाणे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING MIND & HEART

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

Holistic
Empowering
Learning

IT ALL STARTS HERE



42 — YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ — NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ — CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ — 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ — TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ — 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# चिंचवडगावातील 1400 जेष्ठ नागरिकांना

# आयुष्मान भारत वय वंदना 'स्मार्ट कार्डचे वाटप'

## विधायक उपक्रम: भाजपाचे माजी नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांचा पुढाकार

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या वतीने आयुष्मान भारत वय वंदना स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे. आयुष्मान वय वंदना कार्ड हे सामाजिक-आर्थिक स्थिती न पाहता 70 वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण प्रदान करते. हे कार्ड सुमारे 2000 वैद्यकीय प्रक्रियांचे उपचार देते आणि कोणत्याही प्रतीक्षा कालावधीशिवाय पहिल्या दिवसापासून सर्व विद्यमान आजारांना कव्हर करते.**

आतापर्यंत नगरसेवक ॲड.मोरेश्वर शेडगे यांच्या माध्यमातून १४०० पेक्षा जास्त जेष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.
नगरसेवक शेडगे यांच्या जनसंपर्क कार्यालयात दररोज ७० पेक्षा जास्त वय असलेल्या जेष्ठ नागरिकांना आयुष्यमान भारत वय वंदना या योजनेचे लाभार्थी करून घेतले जाते व त्यांना मोफत स्मार्ट कार्ड दिले जाते. आयुष्यमान भारत 'वय वंदना विमा' योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित स्वतः व्यक्ती व त्याचे आधारकार्ड आणि आधारकार्डला लींक असलेला मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.



# निगडी येथे पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया


## आयुक्त शेखर सिंह ह्यांनी ताबडतोब दखल घेऊन ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड : निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे काम सुरू असलेल्या ठिकाणी ड्रिल मशीन पोकलॅण्ड ने रस्त्यावर बोरिंग खोदण्यात येत असताना त्या ठिकाणी पाणी पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया गेले आहे.**

या संदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह ह्यांनी ताबडतोब दखल घेऊन मेट्रो रेल्वे ठेकेदार ह्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी पिंपरी चिंचवड शहर भाजपाचे चिटणीस सचिन काळभोर यांनी केली आहे.

निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे काम सुरू असलेल्या ठिकाणी ड्रिल मशीन पोकलॅण्डने रस्त्यावर खड्डे खोदताना पाणी पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया गेले आहे. सध्या उन्हाळा सुरू असून शहरात पाण्याचा तुटवडा भासत असल्याने मेट्रो रेल्वे काम सुरू असलेल्या ठिकाणी हजारो लिटर पाणी वाया गेले आहे, त्या संदर्भात ताबडतोब दखल घेऊन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे.



## पिंपळे गुरव येथील संत गाडगेबाबा

# ज्येष्ठ नागरिक संघातर्फे स्वच्छता अभियान!

### शासन पुरस्कार प्राप्त अरूण पवार सहकाऱ्यांसह स्वच्छता अभियानात सहभागी

**। पिंपळे गुरव । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघ काशीद पार्क पिंपळे गुरव यांच्यावतीने कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणारे संत “गाडगेबाबा” यांच्या 149 व्या जयंती निमित्त संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर काशीद पार्क व बीआरटी रोड येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच छत्रपती शिवाजी महाराज वनश्री महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त अरुण पवार आपल्या सहकाऱ्यांसह स्वच्छता अभियानात भाग घेतला. पिंपरी चिंचवड महापालिकेचे कर्मचारी राहुल ओव्हाळ व इतर स्वच्छता कर्मचारी यांनी या कामी उत्तम सहकार्य केले.**




यावेळी संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्रीकृष्णा फिरके काशीद म्हणाले की, 2016 मध्ये काशीद पार्क येथे 2 ते 3 ट्रक एवढा कचरा होता की लोकांना जाताना नाक दाबून जावे लागत होते. त्यावेळी वृक्षमित्र अरुण पवार व तानाजी जवळकर यांच्या सहकार्यातून पत्राशेडची उभारणी करून कचरा टाकायच्या जागी ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचनालय सुरू केले. स्वच्छता करून त्या ठिकाणी 1 महिनाभर माणूस ठेऊन त्याठिकाणी 6 ते 7 हजार लोकांचे आरोग्य धोक्यात यायचे थांबले. तसेच 2016 च्या स्वच्छता अभियानांतर्गत काशीद पार्क मधील सर्व गल्ल्या, आळंदी, शिरगाव, देहूगाव, गडकिल्ले या ठिकाणी आम्ही सर्वांनी मिळून स्वच्छता अभियान राबविले याबद्दल त्यांनी वृक्षमित्र अरुण पवार यांचे आभार मानले. तसेच यावेळी मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार यांनी प्रथम संत गाडगेबाबा यांना अभिवादन केले व उपस्थिती पिंपरी चिंचवड महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी यांचेही आभार मानले. कारण स्वच्छता कर्मचारी रोजच स्वच्छता ठेवतात, तेच खरी देशसेवा करतात. तसेच त्यांनी उपस्थित पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी यांना गुलाबाचे पुष्प देऊन सत्कार केला. शेवटी बोलताना अरुण पवार म्हणाले संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्री कृष्णा फिरके काका यांनी सुरुवात स्वतःपासून केली व त्यांचे कार्य युवकांनाही लाजवेल असे आहे. कुठलीही जाहिरात न करता त्यांनी सेवा केलेली आहे. तसेच त्यांनी यावेळी प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीचा रविवार किंवा शेवटचा रविवार ज्येष्ठ नागरिकांच्या माध्यमातून आळंदी, देहू, प्रती शिर्डी शिरगाव तसेच गड किल्ले येथे स्वच्छता अभियान सुरुवात करण्याचा संकल्प केला.

स्वच्छ सर्वेक्षण 2023 व 2024 या दोन्ही वर्षात संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघास महानगरपालिकेतर्फे स्वच्छता पुरस्कार देऊन गौरवण्यात येते आजच्या कार्यक्रमात पीसीएमसी पुरस्कृत स्वच्छता चॅम्पियन संघाचे अध्यक्ष श्रीकृष्ण फिरके, सूर्यकांत भागवत, सूर्यकांत कुरुलकर, दामू राणे, चांदमल सिंघवी, पोपट अण्णा चव्हाण, दौलतराव जाधव, गणेश ठाकरे, शंकर टोपे, विशाल कुंभार, श्रीधर राऊत, श्रीधर साबळे, धनेश कुमार पुरोहित, मोहन भोईटे, दत्तात्रय पाटकर, पितांबर सरोदे, श्री जैन, अशोक नवगण, सुरेश दिघे , अनिल भोळे, श्री.शत्रुघन धुळे, श्री.आनंदराव वानखेडे, दत्तात्रय खताळ, बाळासाहेब वाघ, संजय पाडेकर इत्यादी सदस्य हजर होते सर्वांनी तरुणांच्या जोशात स्वच्छता अभियानात भाग घेतला नंतर चहा पाणी होऊन दौलतराव जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.

## महापालिका दवाखाना अन् प्रसुतीगृह या प्रकल्पाची पायाभरणी

### माजी आ. अश्विनी जगताप यांची उपस्थिती : अत्याधुनिक सोयी-सुविधांचा 9 मजली दवाखाना

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड : किवळे येथील मनपा आरक्षण क्रमांक ०४/१२० दवाखाना व प्रसुतीगृह या प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ आज सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता चिंचवड विधानभेच्या माजी आमदार श्रीमती अश्विनीताई लक्ष्मण जगताप यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.**



या कार्यक्रमास रा.कॉ.पार्टी शराध्यक्ष, माजी महापौर योगेश बहल, स्थानिक ज्येष्ठ नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, मा.नगरसेविका संगीता भोंडवे, मा.नगरसेविका कु.प्रज्ञा खानोलकर, मा.नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, महानगरपालिका नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड, तसेच स्थानिक ग्रामस्थ, मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजन समारंभ संपन्न झाला.

सदर दवाखाना व प्रसुतीगृह हे ६ मजली इमारत असून खास महिलांसाठी अत्याधुनिक सुख सोयी युक्त असे असून सदर दवाखान्यामध्ये तज्ञ डॉक्टरांची ओपीडी सुविधा, महिला व लहान मुले रक्त तपासणी अत्याधुनिक लॅब, अत्यावश्यक विभाग, डायग्नोस्टिक, पॅथ लॅब आणि कुटुंब नियोजन केंद्र, मल्टीपर्पज हॉल, जनरल वॉर्ड तसेच आधी सुविधांचा समावेश आहे. या दवाखान्याचा लाभ देहूरोड, मामुर्डी, किवळे, रावेत व इतर नजीकच्या लोकवस्तीस होणार आहे.